**कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा**
**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ८८/२०२०** **दिनांक ०३ /११ /२०२०** **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८ /११/२०२० ते ०३/११/२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०४ /११ /२०२० सकाळी ८:३० पासून ०८ /११ /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८/१० | २९/१० | ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | | ०४/११ | ०५/११ | ०६/११ | ०७/११ | ०८/११ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३४.६ | ३२.६ | | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३४ |
| २१.४ | २१ | | | | | | किमान तापमान (अं.से) | २४ | २३ | २३ | २३ | २४ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | ० | ० | ० |
| ६३ | ८४ | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६० | ५४ | ५३ | ५१ | ५५ |
| ५६ | - | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३५ | ३१ | २८ | २७ | ३२ |
| २.९ | - | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ७ | ९ | १० | ९ |
| नै. | ई. पू. | | | | | | वाऱ्याची दिशा | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | पू. |
| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | | | | | | | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | | | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा | | |
| ०.० | | | | | | | ३१२०.२ | | | ४२३३.४ | | |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| हवामान पूर्वानुमान | | • **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ४ ते ८ नोव्हेंबर, २०२० दरम्यान कमाल तापमानात वाढ आणि आद्रतेत घट होण्याची शक्यता आहे.** |
| **सामान्य सल्ला** | | • कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• पिकावर कीटक नाशकाची फवारणी करताना आवश्यक पोशाख घालून तोंडावर मास्क बांधावे, कधीही वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नये. |
| **भात** | **दाणे भरणे ते काढणी अवस्था** | • तयार झालेल्या निमगरव्या भात पिकाची सकाळच्या वेळेस कापणी करून मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे. गरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करण्याची पूर्व तयारी करण्यास सुरवात करावी. |
| **नाचणी** | **काढणी अवस्था** | • तयार झालेल्या नाचणी पिकाची सकाळच्या वेळेस कापणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे व नंतर मळणी करावी. |
| **हरभरा** | **पेरणी** | • हरभरा लागवडीसाठी मध्यम ते भारी, काळी कसदार, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. पाणथळ, चोपण, क्षारयुक्त जमिनीत हरभऱ्याची पेरणी टाळावी. बागायती पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. पेरणीस जास्त उशीर झाल्यास किमान तापमान खूपच कमी होऊन उगवण उशिरा आणि कमी होते. पिकाची वाढ कमी होऊन फांद्या, फुले व घाटे कमी लागतात. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास पाच ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हीरीडीची बीजप्रक्रिया करावी किंवा दोन ग्रॅम थायरम अधिक दोन ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. यानंतर प्रति १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबिअम जिवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रवाणातून चोळावे. बियाणे एक तासभर सावलीत सुकवून लगेच पेरणी करावी. पेरणी करताना दोन ओळींतील अंतर ३० सें.मी. आणि दोन रोपांतील अंतर १० सें.मी. राहील, |

| | | |
|---|---|---|
| | | अशा पद्धतीने करावी. |
| **वाल** | **पेरणी** | • वालाची भात कापणी नंतर जमिनीच्या अंग ओलीतावर विनामशागत पेरणी करण्यासाठी भात काढणी नंतर लगेच शेतातील तणांचे ग्लायफोसेट ५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी, त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकण पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. |
| **तूर** | **फुलोरा** | • तूरीवर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या अळ्या शेंगाना छिद्र पाडून अर्धे शरीर बाहेर व अर्धे आत ठेवून दाणे खाते. मोठ्या अळ्या दाणे पोखरून खावून शेंगांचे नुकसान करते. या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास किडीच्या नियंत्रणासाठी क्लोरॅनट्रोनीलीपोल १८.५ टक्के ३ मि.ली. किंवा स्पिनोसॅड ४५% प्रवाही २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **चिकू** | **फळ धारणा** | • वाढत्या तापमानामुळे चिकुच्या बागेत गरजेनुसार पाणी देण्याची व्यवस्था करावी,पाणी देण्यासाठी ड्रीपच्या नळ्या तपासुन घ्याव्यात. झाडाच्या बाजुने चर पध्दतीने खताचा दुसरा हफ्ता द्यावा. शेणखतासोबत ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक द्यावे. |
| **आंबा** | **पालवी फुटणे** | • आंब्याला मोहोर येण्यासाठी झाडाच्या मुळांना ताण बसणे आवश्यक असते. यासाठी बागेतील गवत काढून बागेची साफसफाई लवकरात लवकर पूर्ण करावी. जेणेकरून जमिनीमध्ये असणारे पाण्याचे प्रमाण ओलावा लवकर कमी होऊन झाडाला ताण बसण्यास मदत होईल. |
| **काजू** | **पालवी** | • काजूच्या नवीन फुटलेल्या पालवीवर ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून पहिली फवारणी पालवी फुटण्याच्या वेळी करावी. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • तापमानात वाढ संभवत असल्याने केळी बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे १५ सें. मी. जाडीचे किंवा काळ्या प्लास्टिक कापडाचे आच्छादन करावे, फुलोऱ्यावर आलेल्या केळीच्या झाडाला काठीचा आधार द्यावा. |
| **नारळा** | **वाढीची अवस्था** | • वाढत्या तापमानामुळे नारळावर स्पायर्लींग व्हाईट फ्लायचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास वर्टीसीलियम लीकानी ४० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात फवारावे, किंवा ५० मि. ली. कडूलिंब तेल प्रति १० लिटर पाण्यात फवारावे. |
| **भाजीपाला** | **पुर्नलागवड** | • वांगी व मिरची पिकांची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मिली प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **पशु पालन** | | • कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:8552882712**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान** : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई
२) **मागील हवामान** : भात संशोधन केंद्र, पालघर

**ठिकाण** : कृषि विज्ञान केंद्र पालघर
**दिनांक** : ०३.११.२०२०

**स्वाक्षरित**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**